## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ०५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/०१/२०१७

**१) शेतात लावलेल्या मोटारपंपचे केबल वायर व प्लॅस्टीक पाईपची चोरी. :—**

दिनांक ०१/०१/२०१७ चे पुर्वी यातील अज्ञात आरोपीने अंर्तगाव शेतशीवारातील फिर्यादी व शेताशेजारील वेगवेगळे शेतकरी यांचे मोटार पंपाचे केबल वायर २९० फुट व प्लास्टीक पाईप ३०० फुट असा एकुण ४,४००/—रू चोरून नेल्याने फिर्यादी खेमराज शिवनाथजी मेश्राम वय ३५ वर्ष रा. आथली यांची लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा उईके पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०२/०१/२०१७ चे १९.०० वा. दर. यातील फिर्यादी हि शाळेतील स्नेहसंम्मेलनाचे कार्यक्रम आटोपुन घरी जात असतांना यातील आरोपी क्र. हा तिच्या जवळ जावुन तिच्या डाव्या खांदयावर हात ठेवला व डोक्याचे केस ओढुन डाव्या गालावर मारहान केली व आरोपी क्र. ०२ याने अश्लील शब्दात शेरेबाजी करून फिर्यादीचा विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३५४(अ)(१)(२)(४),३४ भांदवी. सहकलम १२ लैगिंक अपराधापासुन बालकांचे संरक्षण अधि. २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. कुंभरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**३)अल्पवयीन मुलगी घरून निघुन गेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०१/०१/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही मामाच्या घरून कोणालाही काही न सांगता निघुन गेल्याने यातील संशयीत आरोपीने पळवुन नेले असावे असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३६३ भादवी. अन्वये दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**४) अवैध दारू अडयांवर धाडी . :—**

दिनांक ०२/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०२ लिटर हातभट्टी दारु +नगदी १२०/—रू असा एकुन कि. ३२०/—रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.